
# प्रकरण – ५ : भारतातील ग्रामीण विकास

## प्रस्तावना :

भारतीय अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने ग्रामीण अर्थव्यवस्था आहे. देशाची आर्थिक वृद्धी ही ग्रामीण विकासाला गतिशील करते. भारत हा खेड्यांचा देश आहे. ग्रामीण विकास हा विकासाच्या विस्तृत संकल्पनेचा एक महत्वाचा घटक आहे. ग्रामीण विकासाचा अर्थ ग्रामीण भागाचा एकूण विकास ज्यामुळे जीवनमानाच्या गुणवत्तेत सुधारणा होते. २०११ च्या जनगणनेनुसार, देशातील ग्रामीण लोकसंख्या ८३.२५ कोटी (एकूण लोकसंख्येतील ६८.८%) इतकी आहे. ग्रामीण विकास हा सर्वसाधारणपणे दारिद्र्याचे निर्मूलन करणारा सर्वसमावेशक व शाश्वत असावा.

## ग्रामीण विकास :


'ग्रामीण विकास' या संकल्पनेचा उदय कृषी क्षेत्राशी निगडित असून भारतातील दीर्घकालीन कृषी विकासाशी संबंधित आहे.




## जागतिक बँकेने केलेली व्याख्या :

ग्रामीण विकास ही एक अशी व्यूहरचना आहे की ज्यामुळे ग्रामीण भागातील विशिष्ट लोकांचे आर्थिक व सामाजिक जीवनमान उंचावण्यास मदत होते. उदरनिर्वाहाची पातळी उंचावण्यास मदत होते. यामध्ये कूळ, अल्पभूधारक, भूमिहीन शेतमजूर इत्यादींचा समावेश होतो.

**ग्रामीण लोकसंख्येचे व्यावसायिक वर्गीकरण**




**अ) कृषी क्षेत्र :** भारतातील ग्रामीण लोकसंख्येचे कृषी क्षेत्रात विभाजन होते. तसेच शेती व संलग्न उपक्रमात विभागणी होते. शेतीमध्ये अल्पभूधारक, सीमांत शेतकरी व मोठ्या शेतकऱ्यांचा समावेश होतो. शेतीशी संबंधित क्षेत्रात वृक्षारोपण, वनीकरण, मत्स्यव्यवसाय, दुग्धव्यवसाय आणि बागायती शेती यांचा समावेश होतो.

**ब) औद्योगिक क्षेत्र :** औद्योगिक क्षेत्र म्हणजे कच्च्या मालावर प्रक्रिया करून वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या आर्थिक क्रियांचा समावेश असणारे क्षेत्र होय. याचे वर्गीकरण लघुउद्योग, कुटीरोद्योग व ग्रामीण उद्योग या प्रकारे आहे.

**क) सेवा क्षेत्र :** या क्षेत्राला तृतीय क्षेत्र असे म्हटले जाते. त्यामध्ये व्यापार व अंतिम ग्राहक सेवांचा समावेश होतो. उदा. लेखाकर्म सेवा (Accounting), व्यापार सेवा, संगणक सेवा, उपहारगृह, पर्यटन, तसेच किरकोळ व घाऊक व्यापार, वाहतूक यंत्रणा इत्यादी.

## भारतातील ग्रामीण विकास :

भारतात ग्रामीण विकासासाठी सरकारी व निमसरकारी स्तरावर विविध योजना व धोरणे राबविली आहेत. ग्रामीण विकासाच्या व्यूहरचनेमुळे देशात आर्थिक वृद्धी व आर्थिक विकास शक्य होईल.

## ग्रामीण विकासाचे महत्त्व :

**१) सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता :** आरोग्य आणि स्वच्छताविषयक सेवा-सुविधा, शुद्ध पाणीपुरवठा, आणि माफक आरोग्यविषयक सुविधांमुळे ग्रामीण विकासात सुधारणा होतात. यामुळे ग्रामीण भागातील जीवनमानाचा स्तर उंचावला जातो.

**२) ग्रामीण साक्षरता प्रमाण :** सामाजिक व आर्थिक बदल घडविण्यासाठी साक्षरता हे अत्यंत महत्वाचे साधन आहे. नागरी व ग्रामीण भागात साक्षरतेच्या प्रमाणात फारच मोठी तफावत आढळते. ग्रामीण विकासाच्या माध्यमातून विविध

शैक्षणिक योजनांची अंमलबजावणी करून ही तफावत कमी करता येते.

३) **महिला सक्षमीकरण :** ग्रामीण विकासाद्वारे लिंग भेदभाव कमी करणे, ग्रामीण महिलांच्या विविध गरजांची पूर्तता करणे, सामाजिक विकासाच्या कार्यक्रमात महिलांचे योगदान वाढविणे इत्यादींमुळे महिला सक्षमीकरणाला प्रोत्साहन मिळते.

४) **कायदा आणि सुव्यवस्थेची अंमलबजावणी :** सामाजातील वंचित गटांच्या अधिकारांची सुरक्षा ग्रामीण विकासामुळे साध्य करता येते. ग्रामीण विकासामुळे कायदा आणि सुव्यवस्थेची योग्य प्रकारे अंमलबजावणी करता येते.


५) **भू-सुधारणा :** ग्रामीण विकासांतर्गत भू-सुधारणा कायद्यांची परिणामकारक अंमलबजावणी करता येते. उदा. कमाल भू-धारणा, जमिनीची मालकी, खंडाबाबतचे नियमन व भूधारकाची सुरक्षा यांमुळे ग्रामीण भागातील विषमता कमी करता येते.

६. **पायाभूत सुविधांचा विकास :** ग्रामीण विकासाद्वारे पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करता येतात. विशेषतः वीजपुरवठा, रस्ते विकास, जलसिंचनाच्या सोई इत्यादी.

७) **पतपुरवठ्याची उपलब्धता :** ग्रामीण विकासातंर्गत वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांमध्ये वाढ करता येते. ज्यामुळे ग्रामीण भागात वित्त/पतपुरवठा सुलभतेने होऊ शकतो. उदा. प्राथमिक सहकारी कृषी पतपुरवठा संस्था, सहकारी बँक इत्यादी. या संस्थांद्वारे शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात पतपुरवठा करणे शक्य होते.

८) **दारिद्र्य निर्मूलन :** ग्रामीण विकासाद्वारे व्यक्तीचे उत्पन्न व जीवनमान उंचावण्यास मदत होते. यामुळे ग्रामीण भागातील दारिद्र्याचे निर्मूलन करणे शक्य होते.






**आकृती ५.१ : कृषी क्षेत्रातील बदल**

### भारतातील कृषी पतपुरवठा :

कृषीमधील उत्पादन वाढीसाठी कृषी क्षेत्राला दिला जाणारा पतपुरवठा हे अत्यंत महत्वाचे आहे. मुबलक व वेळेत वित्तसहाय्य मिळण्यासाठी शेतीविषयक धोरणांमध्ये वेळोवेळी पुनर्रचना केली आहे. ग्रामीण पतपुरवठा प्रक्रियेत असे गृहीत धरले आहे की, बहुतांश भारतीय ग्रामीण कुटुंबाकडे बचतीचा अभाव असून शेती व इतर आर्थिक कार्यासाठी पुरेसा वित्तपुरवठा नसतो.




### कृषी पतपुरवठ्याचे प्रकार :

कृषी क्षेत्रातील पतपुरवठ्याचे वर्गीकरण खालील गोष्टीवर आधारित आहे.

१) **कालावधीनुसार कृषी पतपुरवठा :** हे कालावधीनुसार दिले जाणारे कर्ज असून याचे तीन प्रकारे वर्गीकरण केले जाते.

**अ) अल्पकालीन पतपुरवठा :** हे कर्ज दोन वर्षापर्यंतच्या कालावधीसाठी दिले जाते. शेतकऱ्यांच्या तत्कालीन गरजांसाठी हे कर्ज दिले जाते. उदा. खते, दर्जेदार बी-बियाणे खरेदी, धार्मिक व सामाजिक समारंभ इत्यादी.

**ब) मध्यमकालीन पतपुरवठा :** हे कर्ज दोन ते पाच वर्षापर्यंत दिले जाते. हे कर्ज जमिनीत सुधारणा करणे, पशुधन व शेतीची उपकरणे खरेदी करणे, कालवा बांधणी, नाला (Canal) बंडिंग इत्यादी वित्तीय गरजांसाठी दिले जाते.

**क) दीर्घकालीन पतपुरवठा :** हे कर्ज पाच वर्षांपेक्षा जास्त कालावधीसाठी दिले जाते. सामान्यत: ट्रॅक्टर खरेदी करणे, जमिनीवरील कायमस्वरूपी सुधारणा करणे इत्यादींसाठी दिले जाते.

**२) हेतूनुसार कृषी पतपुरवठा :** विशिष्ट हेतूनुसार दिले जाणारे कर्ज असून याचे दोन प्रकारे वर्गीकरण केले जाते.

**अ) उत्पादक :** उत्पादक कर्ज हे शेतीतील उत्पादनाशी संबंधित असून आर्थिकदृष्ट्या न्याय्य असतात. उदा. ट्रॅक्टर, जमीन, बियाणे इत्यादी खरेदी करणे.

**ब) अनुत्पादक :** अनुत्पादक कर्ज हे वैयक्तिक उपभोगासाठी असून त्याचा उत्पादक उपक्रमाशी संबंध नसतो. उदा. लग्न कार्यासाठी खर्च, धार्मिक सण-समारंभासाठी खर्च इत्यादी.

**भारतातील कृषी पतपुरवठ्याचे मार्ग :**

१) बिगर संस्थात्मक मार्ग

२) संस्थात्मक मार्ग

**१) बिगर संस्थात्मक मार्ग :** भारतातील ग्रामीण पतपुरवठ्यामध्ये, बिगर संस्थात्मक वित्त हा एक महत्त्वपूर्ण घटक असून, जवळजवळ भारतातील ४०% पतपुरवठा हा बिगर संस्थात्मक आहे. बिगर संस्थात्मक कर्जाचा व्याजदर खूप उच्च असतो. जमीन व इतर संपत्ती तारण म्हणून ठेवली जाते. बिगर संस्थात्मक मार्ग खालीलप्रमाणे आहेत.

**अ) सावकार :** ग्रामीण भागात सावकारी हा सर्वसामान्य व्यवसाय आहे. सावकार भरपूर व्याज दराने कर्ज देतात व शेतकऱ्यांची जमीन तारण ठेवतात.

**ब) इतर वैयक्तिक मार्ग :**

अ) व्यापारी, जमीनदार, अडते इत्यादी.

ब) नातेवाईक, मित्रमंडळी इत्यादी कडून घेतले जाणारे कर्ज.

**२) संस्थात्मक मार्ग :** कृषी पतपुरवठा करण्यासाठी संस्थात्मक मार्ग हे एक प्रगतिशील धोरण आहे. वेळेत व मुबलक प्रमाणात पतपुरवठा करणे, शेतीतील उत्पादन व उत्पादनक्षमता वाढवणे हे प्रमुख धोरण आहे. संस्थात्मक मार्गाने लहान व किरकोळ शेतकऱ्यांना आणि इतर दुर्बल घटकांना कर्ज उपलब्ध करून देणे, तसेच आधुनिक तंत्रज्ञान व आधुनिक शेती पद्धती हा या धोरणाचा प्रमुख भाग आहे.

भारतातील कृषी पतपुरवठा करणाऱ्या काही संस्था खालीलप्रमाणे

**अ) राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड – NABARD) :** कृषी व ग्रामीण विकासाला वित्तपुरवठा करणारी नाबार्ड ही सर्वोच्च वित्तसंस्था आहे. नाबार्डची स्थापना १२ जुलै १९८२ रोजी झाली. नाबार्डचे सुरुवातीचे भांडवल ₹ १०० कोटी असून त्यामध्ये भारत सरकार व मध्यवर्ती बँक (रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया) चे ५०:५० असे योगदान आहे. ही एक सर्वोच्च संस्था असून शेती, लघु उद्योग, कुटीर व ग्रामीण उद्योग, हस्तव्यवसाय इत्यादींच्या विकासाला प्रोत्साहन देते.

३१ मार्च २०१८ रोजी नाबार्डचे भांडवल ₹१०,५८० कोटी इतके होते. भारत सरकार आणि मध्यवर्ती बँक (रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया) यांच्यातील भागभांडवलाच्या रचनेनुसार नाबार्ड ही एक पूर्णपणे भारत सरकारच्या आधिपत्याखालील संस्था आहे.

**ब) ग्रामीण सहकारी पतपुरवठा संस्था :** ग्रामीण पतपुरवठा हा अल्पकालीन सहकारी पतसंस्था व दीर्घकालीन सहकारी पतसंस्था यांत विभागला आहे.

**१) अल्पकालीन सहकारी पतसंस्था :** अल्पकालीन पतसंस्था या अल्पकाळासाठी कर्ज पुरवितात. त्यांची त्रिस्तरीय रचना खालीलप्रमाणे आहे.

- प्राथमिक कृषी पतसंस्था (PACS)
- जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका (DCCB)
- राज्य सहकारी बँक (SCB)

२) **दीर्घकालीन ग्रामीण सहकारी पतपुरवठा संस्था :** या सहकारी संस्था शेतकऱ्यांना दीर्घकालीन पतपुरवठा करून त्यांच्या गरजा पूर्ण करतात. या संस्था दोन स्तरांवर कार्य करतात.

- **प्राथमिक सहकारी शेती व ग्रामीण विकास बँक :** या बँका स्वतंत्रपणे ग्रामीण पातळीवर कार्य करतात.
- **राज्य सहकारी शेती व ग्रामीण विकास बँका (SCB) :** या बँका त्यांच्या शाखांद्वारे राज्य पातळीवर खेड्यांमध्ये कार्य करतात.

**क) व्यापारी बँका (CBs):** व्यापारी बँका ग्रामीण भागांत आपल्या शाखा स्थापन करून ग्रामीण पतपुरवठा करण्याचे काम करतात.

**ड) प्रादेशिक ग्रामीण बँका (RRBs) :** प्रादेशिक अधिनियम, १९७६ अंतर्गत प्रादेशिक ग्रामीण बँकांची निर्मिती करण्यात आली. या विशिष्ट बँका असून ग्रामीण भागातील दुर्बल घटकांच्या गरजा पूर्ण करतात. प्रादेशिक ग्रामीण बँका ग्रामीण भागात स्थापन झालेल्या व व्यापारी बँकांचे व्यावसायिक अनुशासन असलेल्या बँका आहेत.

**इ) सूक्ष्म वित्तपुरवठा संस्था (MFIs) :** सूक्ष्म वित्तपुरवठा संस्था या सवलतीच्या व्याजदराने ग्रामीण पतपुरवठा करतात, परंतु कर्ज पद्धतीत कमी उत्पादकता, कर्ज मिळण्यासाठी विलंब, कर्ज प्रक्रिया खर्च या सर्व कारणांमुळे लहान शेतकऱ्यांना या सवलतीच्या कर्जाचा लाभ घेता येत नाही. म्हणून अशासकीय संस्थांनी १९७० पासून (NGOs) दुर्बल घटकांना कुटुंबांना कर्ज पुरवठा करण्याचे पर्यायी मार्ग उपलब्ध करून दिले आहेत.

**शोधा पाहू :**
नाबार्डच्या अलीकडच्या कामगिरीची माहिती मिळवा.

## स्वाध्याय

**प्र.१. खालील विधाने पूर्ण करा :**

१) **ग्रामीण पतपुरवठा महत्त्वपूर्ण मानला जातो, कारण .....**
अ) ग्रामीण भागातील उत्पन्न वाढण्यास मदत होते.
ब) बचतीचा अभाव असून शेती व इतर आर्थिक कार्यासाठी पुरेसा वित्तपुरवठा नसतो.
क) यामुळे ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होतो.
ड) ग्रामीण भागातील असमानता कमी होते.

२) **उत्पादक कर्ज ही आर्थिकदृष्ट्या न्याय्य असतात, कारण .....**
अ) ते शेती उत्पादनाशी संबंधित आहे.
ब) त्याचा वापर वैयक्तिक उपभोगासाठी केला जातो.
क) ते दारिद्र्य निर्मूलनास मदत करतात.
ड) ते जीवनमान दर्जा उंचावण्यास मदत करतात.

३) **छोटे शेतकरी बँकांकडून देण्यात येणाऱ्या कर्जासाठी अपात्र ठरतात, कारण .....**
अ) सावकारांची उपस्थिती
ब) ग्रामीण भागात बँकांच्या शाखा नसणे.
क) उच्च व्यवहार खर्च/प्रक्रिया खर्च जास्त
ड) मोठ्या शेतकऱ्यांना प्राधान्य

४) **सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांचे हक्क सुरक्षितपणे संरक्षित केले जाऊ शकतात कारण .....**
अ) महिला सक्षमीकरण
ब) कायदा आणि सुव्यवस्थेची अंमलबजावणी
क) पायाभूत सुविधांच्या सुधारणा
ड) जीवनमान दर्जा उंचावणे.

५) **ग्रामीण लोकांचा जीवनमान दर्जा सुधारला जाऊ शकतो, कारण .....**
अ) स्वच्छ पिण्याचे पाणी, आरोग्य आणि स्वच्छता इत्यादी सुविधा पुरविणे/देणे.
ब) भू-सुधारणा कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी
क) अनुदाने उपलब्ध करून देणे.
ड) ग्रामीण असमानता कमी करणे.

**प्र. २. चुकीची जोडी शोधा :**

१)

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| **कृषी पतपुरवठा** | **आवश्यकता** |
| १) अल्पकालीन | खतांची खरेदी |
| २) मध्यमकालीन | लग्नकार्यासाठी कर्जे |
| ३) दीर्घकालीन | ट्रॅक्टर खरेदी करणे. |

२)

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| **ग्रामीण व्यावसायिक वर्गीकरण** | **उपक्रम** |
| १) कृषी/शेती क्षेत्र | बँकिंग आणि विमा |
| २) उद्योग क्षेत्र | कच्च्या मालावर प्रक्रिया |
| ३) सेवा क्षेत्र | संगणीकृत सेवा |

**प्र.३. विधान आणि तर्क प्रश्न –**

**१) विधान 'अ' :** '' भारतीय अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने ग्रामीण अर्थव्यवस्था आहे.''

**तर्क विधान 'ब'** : २०११ च्या जनगणनेनुसार देशातील ग्रामीण लोकसंख्या जवळपास ८३.२५ कोटी (एकूण लोकसंख्येतील ६८.८%) इतकी आहे.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.

२) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.

३) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून 'ब' विधान हे 'अ' विधानाचे बरोबर स्पष्टीकरण आहे.

४) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**२) विधान 'अ' :** सामाजिक व आर्थिक बदलास साक्षरता हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे.

**तर्क विधान 'ब' :** महिला सक्षमीकरण हे लिंग भेदभाव कमी करण्यास मदत करते.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.

२) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.

३) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून 'ब' विधान हे 'अ' विधानाचे बरोबर स्पष्टीकरण आहे.

४) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**३) विधान 'अ' :** कृषी पतपुरवठ्याचा वापर अनुत्पादक कार्यासाठी केला जातो.

**तर्क विधान 'ब'** : शेतीमधील वाढीसाठी कृषी क्षेत्राला दिला जाणारा पतपुरवठा हा अत्यंत महत्त्वाचा आहे.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.

२) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.

३) दोन्ही विधान ('अ' आणि 'ब') सत्य असून 'ब' विधान हे 'अ' विधानाचे बरोबर स्पष्टीकरण आहे.

४) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**४) विधान 'अ' :** भारतातील ग्रामीण पतपुरवठ्यामध्ये, बिगर संस्थात्मक वित्त हा एक महत्त्वपूर्ण घटक आहे.

**तर्क विधान 'ब' :** असुरक्षित उत्पादनामुळे लहान शेतकऱ्यास बँका पतपुरवठा करण्यास असक्षम आहेत.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.

२) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.

३) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून 'ब' विधान हे 'अ' विधानाचे बरोबर स्पष्टीकरण आहे.

४) दोन्ही विधाने ('अ' आणि 'ब') सत्य असून विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**प्र.४. खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून स्पष्ट करा.**

१) कुसुमताईंनी त्यांचा व्यवसाय ग्रामीण भागामध्ये सुरू केला. त्यामुळे तेथील लोकांना रोजगार मिळून त्यांच्या राहणीमानात सुधारणा झाली.

२) रावजींनी कर्ज घेऊन ट्रॅक्टर खरेदी केला.

३) उच्च प्रतीची बि-बियाणे खरेदी करण्यासाठी बँक लहान/छोट्या शेतकऱ्यांना अनुदान पुरविते.

४) दामाजींनी यावेळी सावकाराकडून कर्ज घेण्याऐवजी गावातील पतसंस्थेकडून कर्ज घेतले.

५) रामरावजींनी शेतीमध्ये सिंचन व्यवस्थेच्या उद्देशाने बँकेच्या अटी व नियमानुसार दहा वर्षासाठी कर्ज घेतले.

**प्र. ५. खालील उतारा काळजीपूर्वक वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

ग्रामीण विकास हा प्रशासनाचा एक वंचित भाग आहे. महात्मा गांधी यांच्या मते भारत हा खेड्यांचा देश आहे. खेड्यांचा विकास झाल्याशिवाय देशाचा विकास साध्य करणे अशक्य आहे. विकासाच्या धोरणांचे एकत्रीकरण करण्यासाठी सर्व गरजांचे नियोजन करणे आवश्यक आहे. तळागाळातील लोकांच्या विकासासाठी प्रभावी प्रशासनाद्वारे ग्राम पातळीवर हे शक्य आहे. पंचायती राज्यव्यवस्थेच्या माध्यमातून राष्ट्रीय व राज्य सरकारांच्या विक्रेंद्रीकरणाच्या दिशेने पाऊल टाकण्यासाठी 'आदर्श गाव' या संकल्पनेचा संपूर्ण भारतातील यशस्वी यशोगाथांच्या माध्यमातून अभ्यास करणे गरजेचे आहे. शिक्षणातील विषमता कमी करण्यासाठी आणि साक्षरतेच्या प्रमाणात वाढ करण्यासाठी भारताची वाटचाल योग्य दिशेने सुरू असली तरी अजून बरेच काही करणे आवश्यक आहे. पूर्वीपासून वंचित असलेल्या भारतीय नागरीकांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेण्याची स्वयंशासन हमी घेते.

१) महात्मा गांधीचे विचार थोडक्यात सांगा.

२) ग्रामीण विकासाबाबत शासनाच्या भूमिकेवर प्रकाश टाका.

३) ग्रामीण विकास साधण्यासाठी कोणत्या उपाययोजना सुचवल्या आहेत?

४) गावाचा उत्कृष्ट नमुना तुमच्या शब्दांत मांडा.

◈◈◈